फोन नं. (02164) 272414,
8275706613
Web : http://gcekarad.ac.in
Email: principal@gcekarad.ac.in,

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

विद्यानगर, कराड पिन - 415124 जि. सातारा

---

जा.क्रं.शाअमक/शिष्यवृत्ती/ २०२६/ 952 दिनांक :- 28 APR 2026

## सूचना अत्यंत महत्वाची

**विषय - अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील महाडीबीटी (MahaIT) पोर्टलवर सन 201९-20 ते 2025-26 या कालावधीतील प्रलंबित अर्जाची पूर्तता करण्याबाबत.........**

**संदर्भ - जा.क्र.सआसकसा/भासशि/डीबीटी/२६-२७ /११४१ दिनांक :- १७/०४/२०२६. रोजीचे पत्र.**

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने महाडीबीटी पोर्टलच्या सुधारित धोरणानुसार, शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून 'व्हर्जन 2.0' (Update Version २.०) कार्यान्वित करण्यात येणार आहे. या नवीन प्रणालीमध्ये डेटा हस्तांतरित करण्यासाठी जुन्या प्रणालीवरील सर्व प्रलंबित कामे पूर्ण करणे अनिवार्य आहे.

सद्यस्थितीत, अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील अनेक विद्यार्थ्यांचे सन 2019-20 ते 2025-26 या कालावधीतील शिष्यवृत्ती अर्ज विविध त्रुटींमुळे विद्यार्थी स्तरावर प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे.

**विद्यार्थ्यांसाठी आवश्यक कार्यवाही**:- अर्जाची स्थिती तपासाः ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटींमुळे (Redeclare/Scrutiny) परत आले आहेत, त्यांनी तात्काळ आपले महाडीबीटी लॉगिन तपासावे.

**त्रुटींची पूर्तता**:- अर्जामध्ये ज्या त्रुटी दर्शविल्या आहेत, त्यांची कागदपत्रांसह पूर्तता करून अर्ज पुन्हा सबमिट करावा.

**अंतिम मुदत**:- ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी केवळ २ (दोन) दिवसांचा कालावधी देण्यात येत आहे, जेणेकरून महाविद्यालय स्तरावरून 10 मे 2026 पूर्वी सर्व अर्ज निकाली काढता येतील.

**महत्त्वाची टीप**:- जर विहित मुदतीत अर्जातील त्रुटी दूर केल्या नाहीत, तर नवीन प्रणालीमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होऊन आपणास शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहावे लागू शकते. यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वतः जबाबदार राहतील.

तरी, संबंधित विद्यार्थ्यांनी या सूचनेची गांभीर्याने नोंद घेऊन आपले प्रलंबित अर्ज त्वरित पूर्ण करावेत.

प्राचार्य,
**शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,कराड**

**प्रत.- १. सर्व सूचना फलकावंर लावणेसाठी.**
**२. संस्थेच्या संकेतस्थळावरती. (अपलोड करण्यासाठी)**